प्रचंड खपाचे एकमेव हीरकमहोत्सवी दैनिक

# पुढारी

कोल्हापूर, सांगली, सातारा, पुणे, सोलापूर, सिंधुदुर्ग, रत्नागिरी,
बेळगाव व पणजी येथून एकाचवेळी प्रसिद्ध

▶ वर्ष ६६ ▶ अंक ३४५ ▶ मंगळवार, १४ डिसेंबर २००४ ▶ पाने सोळा ▶ किंमत २ रुपये

दैनिक पुढारी, १४ डिसेंबर २००४, पान दहा (पुणे)

# होमिओपॅथीला लोकप्रिय बनविणारे डॉ. अमरसिंह निकम

पिंपरीचे डॉक्टर अमरसिंह द. निकम यांना नुकतेच 'इंदिरा गांधी सद्भावना व 'सुवर्णपदक' या पारितोषिकाने महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री व आंध्र प्रदेशचे राज्यपाल सुशीलकुमार शिंदे यांच्या हस्ते गौरविण्यात आले. त्यांच्या होमिओपॅथीसाठी उत्तुंग अशा कार्याबद्दल त्यांना जागतिक दर्जाचा द गोल्ड स्टार ऑफ मिलेनिअम हा आंतरराष्ट्रीय पुरस्कार इंडो थायलंड फ्रेंडशीप इकॉनॉमिक कार्पोरेशनतर्फे बँकॉक शहरात दि. २० जानेवारी २००५ रोजी प्रदान करण्यात येणार आहे. त्यानिमित्त .

आजच्या या धावपळीच्या जीवनात हजारो लाखो लोक लहान मोठ्या आजारांवरती लाखो रुपये खर्च करतात. अशातच होमिओपॅथी अनेक असाध्य, जुनाट व दुर्धर आजारांवर प्रभावी इलाज करते तसेच दुसऱ्या चिकित्सा पद्धतीपेक्षा अल्प खर्चात रोग्याला कायमची त्या रोगापासून मुक्तता देते, हे मी नुसते आजपर्यंत ऐकतच होतो. परंतु जेव्हा पुण्यातील पिंपरी या गावात गेलो आणि तेथील शंकराच्या तपोवन मंदिराशेजारी 'आदित्य होमिओपॅथीक हॉस्पिटल अँड हिलींग सेंटर' नावाचे नवे मंदिर पाहिले. तेव्हा या गोष्टीची सत्यता दिसली.

तेथे ना कसली धावपळ ना गोंगाट ना घबराहट ना सलाईन ना अतिदक्षता विभाग व ना ऑपरेशन थिएटर एवढेच नव्हे तर साधी एक इंजेक्शनची सुईसुद्धा माझ्या दृष्टीस पडली नाही. भव्य हे असे ६० बेडचे हॉस्पिटल आहे. प्रत्येक रुग्णाची माहिती डॉ. निकम यांनी मला दिली. विविध वयोगटातील देशाच्या कानाकोपऱ्यातून



डॉ. अमरसिंह निकम यांचे आदित्य होमिओपॅथीक हॉस्पिटल. इन्सॅटमध्ये डॉ. निकम.

नव्हेच तर परदेशातूनही आपल्या विविध अशा असाध्य व्याधींवर उपचार घेण्यासाठी रुग्ण आलेले होते. त्यात किडनीच्या, हृदयाच्या, मधुमेहाच्या, उच्च रक्तदाबाच्या तर कोणी यकृताच्या, फुफुसाच्या, पोटाच्या, सांधेदुखीच्या एवढेच नव्हे तर कर्करोगाच्या व्याधींनी ग्रस्त आहेत असे रुग्ण आढळले. त्यांनी आपल्या आजारासाठी भरपूर वेगळ्या चिकित्सा पद्धतीचे औषधोपचार घेतले. परंतु त्यातून त्यांना काही निष्पन्न झाले नाही. आजार वाढतच गेला, पण येथे त्यांना त्यांच्या आजारापासून मुक्ती मिळत आहे.

साबुदाण्यासारख्या दिसणाऱ्या या होमिओपॅथीक गोळ्या रुग्णाला रोगमुक्त करतात. या उपचार पद्धतीमध्ये माणसाचा आजार व त्याची लक्षणे एवढेच लक्षात न घेता, त्या माणसाचा स्वभाव, आवड-निवड, राहणीमान, व्यसन, तहानभूक, झोप, स्वप्ने, भीती, काळजी तसेच त्याला लहानपणापासून झालेले आजार या सर्व गोष्टी विचारात घेऊन त्या रुग्णाला औषधे दिले जाते व ते एकच औषध रुग्णाची विविध आजारांपासून कायमची मुक्तता करते. आपल्याच आदित्य होमिओपॅथीक हॉस्पिटलपुरती ही रुग्णसेवा, रुग्णोपचार व होमिओपॅथीचे ज्ञान डॉक्टर निकमांनी मर्यादित ठेवलेले नाही. मुंबई, कोल्हापूर, अहमदनगर, पुणे (भारती विद्यापीठ, धोंडूमामा साठे, काकासाहेब म्हस्के, श्री जगद्गुरू पंचाचार्य होमिओपॅथीक वैद्यकीय महाविद्यालय) अध्यापनासाठी जात असतात. पण समाजातील गरजू व गरीब रुग्णांची सेवा करता यावी म्हणून पंढरपूर, त्र्यंबकेश्वर, नाशिक (कुंभमेळा), गगनबावडा (कोल्हापूर), गणपतीपुळे, अमरनाथ इत्यादी तीर्थक्षेत्रांना जाणाऱ्या वारकऱ्यांवर मोफत औषधोपचार करण्यासाठी ते भ्रमंती करत असतात. 'रुग्णसेवा हाच ध्यास, रुग्णसेवा हाच श्वास' अशा भारावलेल्या अवस्थेत हा धन्वंतरी रात्रंदिवस धावपळ करत असतो.

-राहुल गोविंद म्हेतर, कोल्हापूर